# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ४५–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. नानासो बाबा लिंगाडे,<br>मु.पो. कोसारी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत , जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत

श्री. नानासो बाबा लिंगाडे, मु.पो. कोसारी, ता. जत, जि. सांगली यांनी वितरण कंपनीकडे घरगुती वीज कनेक्शना मिळावे यासाठी दि. २७.७.२००९ ला अर्ज केला. त्यानंतर अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे रितसर तक्रार दि. २४.१२.२००९ रोजी दाखल केली. अंतर्गत कक्षाने दि. ३०.१२.२००९ च्या आदेशात तक्रारदार यांस चलन देण्यात यावे व विलंब झाला असल्यास कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार भरपाई द्यावी असे आदेश दिले.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी दि. २४.२.२०१० रोजी मंचासमोर दाखल केली. त्यामध्ये एस.ओ.पी. प्रमाणे कोटेशन मिळून विलंबापोटी भरपाई मिळावी व वीज कनेक्शन मिळावे अशी मागणी केली.

वितरण कंपनीने आपल्या दि. १५.४.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांस दि. २५.२.२०१० रोजी चलन देण्यात आले आहे व तक्रारदाराने चाचणी अहवाल दि. ५.३.२०१० रोजी दिला आहे. त्यांचे .०३ कि.मी. सिंगल फेज दोन वायरचे काम आहे ते एस.ओ.पी.च्या मुदतीत करण्यात येईल असे म्हटले आहे. वि.प.ने आपल्या अहवालासोबत कोटेशनची झेरॉक्स व तक्रारदार यांचा दि. १६.४.२०१० चा मंचास अग्रेषित केलेला अर्ज दाखल केला आहे.

सुनावणीचेवेळी तक्रारदार गैरहजर. वि.प.चे संबंधित अधिकारी उपस्थित. वि.प.ने तक्रारदाराचे अर्जावर भर देवून विलंबापोटी भरपाई सोडून दिल्याचे म्हटले आहे. ५ पोल उभे केले आहेत व लाईनचे काम पूर्ण करुन देणार आहे असे म्हटले आहे. तक्रारदार उपस्थित असते तर या अर्जावरुन त्यांचे म्हणणे घेता आले असते. तक्रारदाराची १६.४.२०१० च्या अर्जावर इंग्रजीत सही आहे. त्यामुळे दि. २६.८.२००९ ते २५.२.२०१० या कालावधीच्या विलंबापोटी भरपाईची मागणी सोडून दिली आहे असे अर्जावरुन दिसते. तक्रारदाराच्या कनेक्शनसाठी ५ पोल वि.प.ने उभे केले आहेत व त्यास लवकर लाईनचे काम करुन कनेक्शन मिळण्याची आशा आहे, म्हणून तक्रारदार तक्रार रद्द करीत आहे. यावरुन एक गोष्ट स्पष्ट होते की, तक्रारदाराची विलंबापोटी भरपाईची मागणी निकाली काढणे योग्य होईल व वीज कनेक्शनबाबत त्यांस आदेश मिळणे जरुरीचे आहे.

मंचाकडे मोठ्याप्रमाणे दाखल होणारी प्रकरणे व वि.प.कडून कागदपत्रे मिळण्यास होणारा विलंब यामुळे प्रकरण दोन महिन्याचे मुदतीत निकाली काढता आले नाही.

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार अंशतः मंजूर करणेत येत आहे. तक्रारदाराची विलंबापोटी भरपाईची मागणी निकाली काढण्यात येत आहे. वि.प.ने प्राधान्यक्रमानुसार व नियमाप्रमाणे तक्रारदार यांस वीज जोडणी द्यावी.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ५.५.२०१०

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :